




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ७८ वा | शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# शेतकऱ्यांना ५ हजार, शक्तिपीठसाठी १ लाख कोटी !

# शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा प्रकल्प कोणाच्या फायद्यासाठी ?

## जयंत पाटील-सतेज पाटलांचा सरकारवर हल्लाबोल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात दुष्काळाचे संकट गडद होत असताना शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारकडे निधी नसल्याचे चित्र आहे. मात्र, दुसरीकडे शक्तिपीठ महामार्गासाठी हजारो कोटी रुपये खर्च करण्याचा अट्टाहास सुरू आहे. शेतकऱ्यांना मदतीसाठी पैसे नाहीत, मग शक्तिपीठ महामार्गासाठी हजारो कोटी रुपये कुठून येत आहेत? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी उपस्थित केला. तर, शेतकऱ्यांच्या माथ्यावर हा प्रकल्प मारून त्यांना उद्ध्वस्त का करत आहात, असा घणाघात काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी केला.

शक्तिपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय सुरू असलेली जमिनीची मोजणी थांबविण्याच्या मागणीसाठी गुरुवारी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले. जयंत पाटील, काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अभिजीत पाटील, संघर्ष समितीचे समन्वयक गिरीश फोंडे, के. के. पाटील यांच्यासह बाधित शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर शेतकऱ्यांनी 'एकच जिद्द, शक्तिपीठ रद्द' आणि 'जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची' अशा घोषणा देत जोरदार निदर्शने केली. शेतकऱ्यांचा विरोध डावलून पोलीस बळाचा वापर करून मोजणी सुरू ठेवल्यास आम्ही स्वतः शेतात उतरून ती रोखू, असा इशाराही नेत्यांनी दिला.

**एक लाख कोटींचा प्रकल्प नेमका कोणासाठी ?**

शक्तिपीठ महामार्गाच्या वाढत्या खर्चावर बोट ठेवत सतेज पाटील यांनी सरकारच्या आर्थिक नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, की १२ जिल्ह्यांतून जाणाऱ्या या महामार्गाचा प्रारंभीचा खर्च ८६ हजार कोटी रुपये होता. आता तो वाढून एक लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. केवळ जमीन अधिग्रहणासाठीच २२ ते २८ हजार कोटी रुपये खर्च होण्याचा अंदाज आहे.

तत्कालीन वित्तमंत्री आणि वित्त विभागानेच हा प्रकल्प सरकारला परवडणारा नसल्याची तसेच त्याची आवश्यकता नसल्याची नोंद केल्याचा दावा सतेज पाटील यांनी केला. असे असतानाही 'हुडको'कडून कर्ज घेऊन हा प्रकल्प पुढे रेटण्याचा प्रयत्न का केला जात आहे? शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन नेमका कोणाचा फायदा साधला जात आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या विरोधाला न जुमानता जबरदस्तीने मोजणी करण्याचा प्रयत्न झाल्यास खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह आपण स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन उभे राहू, असा इशाराही त्यांनी दिला.

**शेतकऱ्यांच्या जमिनींसाठी पोलीस बळाचा वापर का ?**

जयंत पाटील यांनी मोजणीच्या प्रक्रियेत प्रशासनाकडून होत असलेल्या कथित बळाच्या वापरावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांची संमती नसताना शेकडो पोलिसांचा ताफा घेऊन जमिनींची मोजणी करणे, शेतकऱ्यांना घेराव घालणे आणि महसूल प्रशासनाची कामे पोलिसांकडून करून घेणे, हे लोकशाहीला साजेसे नाही, अशी टीका त्यांनी केली.

शेतकऱ्यांना विश्वासात घेण्याऐवजी पोलीस बळाचा आधार घेऊन प्रकल्प रेटण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर त्याला शेतकरी आणि विरोधकांकडून तीव्र विरोध होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन मोजणी तातडीने थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

**दुष्काळात पाच हजारांची मदत; महामार्गासाठी हजारो कोटी!**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा उल्लेख करत जयंत पाटील यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमावर प्रश्न उपस्थित केले. शेतकरी आर्थिक संकटात असताना त्यांना केवळ पाच हजार रुपयांची मदत देऊन प्रश्न सुटणार नाहीत. शेतकऱ्यांना दिलासा देणे, दुष्काळावर मात करणे आणि शेतीला आधार देणे याला सरकारने प्रथम प्राधान्य दिले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. सरकारकडे आधीच्या कामांची मोठ्या प्रमाणात बिले थकीत असल्याचा आरोप करत नवीन प्रकल्प आणि कंत्राटांच्या वाटपापेक्षा दुष्काळ निवारण महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. विरोधकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सरकार पाच मिनिटांचाही वेळ देत नसल्याची टीका करत त्यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवरही निशाणा साधला.



**एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावरही सतेज पाटलांचा निशाणा**

शक्तिपीठ महामार्गाच्या मुद्द्यासोबतच सतेज पाटील यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर टीका केली. एसटी कर्मचाऱ्यांना दिलेल्या आश्वासनांचे काय झाले, याचे उत्तर आधी द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. ग्रामीण भागाची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाला पुरेसे अर्थसाह्य न देता खासगीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**शक्तिपीठचा वाद आणखी पेटणार ?**

शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीवरून सोलापूर जिल्ह्यात संघर्षाची परिस्थिती निर्माण होत असताना महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देत सरकारला इशारा दिला आहे. दुसरीकडे, चार दिवसांपूर्वी माढा तालुक्यातील तुळशी येथे काही ग्रामस्थांनी मोजणीचे स्वागत करून मोजणी यंत्राची पूजा केली होती. त्यामुळे या प्रकल्पाबाबत स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या भूमिका समोर येत आहेत. मात्र, बाधित शेतकऱ्यांचा विरोध डावलून मोजणी सुरू ठेवल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा विरोधी नेत्यांनी दिला आहे. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गाचा प्रश्न आता केवळ विकासकामापुरता मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या जमिनी, सरकारी खर्च आणि प्रशासनाच्या भूमिकेवरून राजकीय संघर्षाचा केंद्रबिंदू बनला आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळणार की शक्तिपीठ महामार्गासाठी सरकारचा हट्ट कायम राहणार? याकडे आता सोलापूर जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

## उजनीच्या धरणाच्या बॅकवॉटरमध्ये होणार चारा लागवड

### चाऱ्यासाठी अनुदान मिळणार की छावण्या ?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दुष्काळी परिस्थितीत पुढील काही महिने पशुधनाला चारा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. यासाठी सिंचन भागात आणि विशेषकरून उजनी धरणाच्या बॅकवॉटर भागात शेती असलेल्या शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी बियाणे वाटप करण्यात येणार आहे. त्यातून जिल्ह्याला आणि किंबहुना राज्यासाठीही चारा देण्यात येईल.



साधारण तीन कोटी रुपयांचे बियाणे सहा ते सात हजार लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

दुष्काळावर मात करण्यासाठी जिल्हा परिषदेची यंत्रणा कार्यरत असून, जलसंधारणाच्या कामावर विशेष भर देण्यात येणार आहे. याबाबत बोलताना कुशल जैन म्हणाले की, शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेला डीपीसीतून (जिल्हा वार्षिक योजना) मिळणारा निधी जलसंधारणाच्या कामासाठी वापरण्यात येणार आहे. तसेच 'जी रामजी' योजनेतून शेतकऱ्यांना विहिरी व इतर कामे करता येणार आहेत.

पशुधन वाचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत असून, सध्या सुरुवातीला चाऱ्यासाठी बियाणे वाटप केले जात आहे. यापूर्वी जून महिन्यात दोन कोटी रुपयांतून जवळपास ४ हजार २०० शेतकऱ्यांना बियाणे वाटप करण्यात आले होते. आता पुन्हा तीन कोटी रुपयांचे बियाणे वाटण्यात येणार असून, याद्वारे मोठ्या प्रमाणावर चारा निर्मिती होईल.

चाऱ्यासाठी डीबीटी की छावण्या? शेतकऱ्यांना चारा खरेदी करण्यासाठी थेट डीबीटीद्वारे (थेट लाभ हस्तांतरण) अनुदान देण्याची मागणी होत असून, याबाबत शासनस्तरावरून प्रयत्न सुरू आहेत. चारा खरेदीसाठी अनुदान दिल्यास चारा उपलब्ध आहे, असे सिद्ध होते; पण चाराच नसेल तर अनुदान देऊन काय उपयोग होणार आहे?, असा सवाल काही लोकांकडून उपस्थित केला जात असल्याचे कुशल जैन यांनी सांगितले. मात्र, डीबीटी द्यायची की चारा छावण्या सुरू करायच्या, याबाबतचा अंतिम निर्णय शासनस्तरावर घेतला जाणार आहे.

गावातून मागणी आल्यास ४८ तासांत टँकर सध्या जिल्ह्यातील १२३ टँकरांद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, त्याशिवाय आणखी २४ गावे आणि १८ वाड्या-वस्त्यांतून पाण्याची मागणी आलेली आहे. गावातून मागणी आल्यानंतर ४८ तासांमध्ये प्रत्यक्ष गावात जाऊन तपासणी करून अहवाल देणे बंधनकारक आहे. गावाला खरोखरच टँकरची गरज असल्यास तो तात्काळ सुरू करण्याचे निर्देश दिल्याची माहितीही मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.






## सोलापूरच्या ६८८ कोटींच्या उड्डाणपुलाचे काम मार्चमध्ये सुरू होण्याची शक्यता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील जुना पूना नाका ते पत्रकार भवन ते बोरामणी नाका या नऊ किलोमीटर लांबीच्या उड्डाणपुलाच्या कामाला आणखी काही महिने प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे.

या प्रकल्पासाठी ६८८ कोटी रुपयांची निविदा बिल्डकॉन कंपनीला मंजूर झाली आहे. मात्र, अद्याप कार्यारंभ आदेश (वर्कऑर्डर) मिळालेला नसल्याने प्रत्यक्ष काम मार्चमध्ये सुरू होण्याची शक्यता महामार्ग विभागातील सूत्रांनी व्यक्त केली आहे.



उड्डाणपुलाच्या निविदेची रक्कम जीएसटीसह सुमारे ८३० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. याशिवाय प्रकल्पाशी संबंधित अन्य कामांसाठी आणखी सुमारे ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे १,४०० कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

या उड्डाणपुलाचे भूमिपूजन २०१६ मध्ये केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले होते. मात्र, आवश्यक जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने प्रकल्पाचे काम अनेक वर्षे रखडले. या विलंबाबाबत गडकरी यांनी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींविषयी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन जमीन संपादनासाठी विशेष मोहीम राबविली.

दरम्यान, राज्य सरकारच्या मालकीची जमीन महामार्ग विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. मात्र, केंद्र सरकारच्या मालकीच्या चार जागांचे हस्तांतरण अद्याप बाकी आहे. या जागांच्या हस्तांतरणासाठी संबंधित विभागांशी पत्रव्यवहार सुरू असून, अंतिम बैठक घेऊन प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. ही प्रक्रिया ऑक्टोबरअखेर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होणे आणि कार्यारंभ आदेश मिळणे या बाबींवर प्रत्यक्ष काम सुरू होण्याची वेळ अवलंबून आहे. त्यामुळे सोलापूर शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या उड्डाणपुलाच्या कामाला मार्चमध्ये सुरुवात होते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी जाहीर; २,५४९ मतदार पात्र

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली. या यादीनुसार एकूण २ हजार ५४९ मतदार निवडणुकीसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये पंढरपूर तालुक्यातील ४० दूध संस्थांसह सांगोला तालुक्यातील २५ संस्थांचा समावेश आहे.



मात्र, काही संस्थांच्या मतदार यादीबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल असल्याने अंतिम मतदारसंख्येत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत २ हजार ४८५ मतदार पात्र होते. त्यानंतर हरकती आणि पात्रतेच्या छाननी प्रक्रियेत काही बदल करण्यात आले. अक्कलकोट तालुक्यातील एका दूध संस्थेला अपात्र ठरविण्यात आले, तर सांगोला तालुक्यातील 'अ' वर्गातील एका संस्थेचा समावेश करण्यात आला.

याशिवाय 'ई' वर्गातील ११, 'क' वर्गातील एक आणि 'ड' वर्गातील १२ संस्थांचा अंतिम मतदार यादीत समावेश करण्यात आला आहे. पंढरपूर तालुक्यातील संस्थांचाही यादीत समावेश झाल्याने एकूण पात्र (पान 2 वर..)






## तुकाराम मुंढेंची नजर आता मसाल्यातील भेसळीवर

### सात वर्षांपर्यंत शिक्षा, 10 लाखांचा दंड

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाच्या माध्यमातून 'सेफ फूड, सेफ ड्रग्स' अभियान आक्रमकपणे राबवणारे डॅशिंग अधिकारी आणि एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची नजर आता मसाले आणि मसाल्याच्या पदार्थांतील भेसळीकडे वळली आहे.

दूध आणि डेअरी उत्पादकांनंतर आता तुकाराम मुंढे यांनी मसाला उत्पादक, विक्रेते आणि हॉटेल व्यावसायिकांसाठी कडक आदेश जारी केले आहेत.

या आदेशांनुसार, मसाल्यांमध्ये भेसळ करणे,



कृत्रिम रंगांचा वापर करणे किंवा पॅकेटवर खोटे आणि दिशाभूल करणारे दावे करणे यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मकोका सारखी कठोर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**सुट्ट्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी; काय आहेत एफडीएचे नवे नियम ?**

एफडीएने जारी केलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार हळद, तिखट, मिरची, दालचिनी, काळीमिरी, खसखस यासह सर्वच प्रमुख मसाले आणि मसाल्यांच्या पदार्थांवर खालील कडक नियम लागू करण्यात आले आहेत.

बाजारात सुट्ट्या मसाल्यांची विक्री करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. केवळ वैध अन्न परवाना असलेल्यांनाच मसाले विक्री करता येईल.

(पान 2 वर..)

## ॲड. आनंद कुर्डूकर यांची जिल्हा सरकारी वकीलपदी नियुक्ती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हा सरकारी वकीलपदाची धुरा आता ज्येष्ठ वकील आनंद कुर्डूकर यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना महाराष्ट्र शासनाने जारी केली आहे. दरम्यान, या पदावर कार्यरत असलेले प्रदीप रजपूत यांची सेवा तत्काळ प्रभावाने संपुष्टात आणल्याचेही शासनाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात स्पष्ट केले आहे.

२० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव; ३५१ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा मिळवून देण्यात मोठे योगदान

नूतन जिल्हा सरकारी वकील ॲड. आनंद कुर्डूकर हे सन १९८५ पासून विधी क्षेत्रात कार्यरत आहेत.



गेल्या २० वर्षांपासून ते सहाय्यक सरकारी वकील (Assistant Government Pleader) म्हणून अत्यंत प्रभावीपणे काम पाहत आहेत.

आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी सरकार पक्षातर्फे सक्षमपणे बाजू मांडत तब्बल ३५१ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावून देण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय न्यायालयीन योगदानाची आणि दांडग्या अनुभवाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे.

**विधी वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव**

ॲड. आनंद कुर्डूकर यांच्या नियुक्तीचे वृत्त समजताच सोलापूरच्या वकील वर्तुळात आनंद व्यक्त करण्यात आला. माजी जिल्हा सरकारी वकील संतोष न्हावकर, ज्येष्ठ विधिज्ञ उमेश मराठे, ॲड. शांतवीर महिंद्रकर यांच्यासह सोलापूर बार असोसिएशनमधील अनेक नामवंत विधिज्ञांनी ॲड. कुर्डूकर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# आंदोलनाला बेड्या, लोकशाहीला ठोकर!

सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयाचे आभार. हे आभार नागरिकांच्या निदर्शनांच्या अधिकारावर गदा आणण्याचा सरकारचा प्रयत्न त्यांनी तूर्त हाणून पाडला; यासाठी झुरळ या यःकश्चित मानल्या जाणाऱ्या सजीवास राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले गेल्यानंतर या झुरळांच्या जगण्याच्या, अभिव्यक्तीच्या अधिकारांचे रक्षण करणे हे सर्वोच्च न्यायालयाचे कर्तव्य होते. ते त्यांनी पार पाडले. हा सर्वार्थाने आंदोलकांचा विजय. कॉक्रोच जनता पार्टीच्या 'पोट्टयांना' रोखण्यासाठी देशाच्या राजधानीत ४० हजार सुरक्षा रक्षक तैनात करावे लागत असतील आणि रविवारी, सुट्टीच्या दिवशी सर्वोच्च न्यायालयास विशेष बैठक बोलावून मेट्रो/ रेल्वे/ रस्ते/ इंटरनेट वाहतूक सुरळीत व्हायलाच हवी असे सरकारला बजावण्याची वेळ येत असेल तर यातून 'झुरळांचे' आंदोलन अत्यंत यशस्वी ठरले हे आणि हेच वास्तव दिसून येते.

मुख्य निवडणूक आयुक्त श्रीमान ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी राजधानीतील 'जंतर मंतर' येथे आंदोलन करण्याची हाक 'सीजेपी'ने दिली आणि त्यास अपेक्षेप्रमाणे चांगला प्रतिसाद मिळाला. पण तो अभूतपूर्व ठरला. कारण या संभाव्य आंदोलनाच्या पराभवासाठी सरकारने राबवलेले विषम उपाय. वास्तविक सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात सरकारला मर्यादांची जाणीव करून दिलेली होती. "माशी मारण्यासाठी कोणी हातोडा हाणत नाही", हे सर्वोच्च न्यायालयाचे या संदर्भातील उद्गार. पण खिळा लहान असो की मोठा, माशी की मच्छर विद्यमान सरकारला हातातील हातोडा उगारण्याचा मोह काही आवरत नाही.

सामर्थ्याचे महत्त्व संयमात असते. संयतवृत्ती सामर्थ्यास अधिक समर्थ बनवते. पण हा विवेक असल्याचा पुरावा विद्यमान सरकारने दर्शवलेला नाही. एखाद्या गुन्हेगाराचे घर शासकीय अधिकाऱ्यांचे बुलडोझरी प्रदर्शन करत पाडणे हे या सरकारचे वारंवार प्रदर्शित पुरुषार्थ दर्शन. त्याचे विकृत तांडव 'सीजेपी' आंदोलन मोडून काढण्याच्या मिषाने दिल्लीत दिसून आले आणि ते सर्वांना जगाने पाहिले. अगदी 'संयुक्त राष्ट्र मानवी हक्करक्षण आयोगा'स त्याची दखल घ्यावी लागली. हे 'लोकशाहीच्या जननी'स खचितच अशोभनीय. जे झाले ते पाहता सरकारने आपल्या अधिकाऱ्यांस इतका निरंकुश वरवंटा फिरवण्याची गरज होती का, असा प्रश्न.

त्याचे उत्तर होकारार्थी देऊ इच्छिणारे एका (च) मुद्द्याकडे लक्ष वेधतील. तो मुद्दा म्हणजे परवानगी नसतानाही 'सीजेपी'चा आंदोलन करण्याचा दुराग्रह. हा मुद्दा अत्यंत तर्कदुष्ट आणि मतलबी आहे. त्याचे प्रत्युत्तर 'सरकार शांततापूर्ण आंदोलनास परवानगी देतच नसेल तर काय?' या प्रतिप्रश्नाने देता येईल. या प्रकरणात सरकारने आंदोलकांस अशी परवानगी दिली असती तर काय घडले असते? आंदोलक जमले असते, घोषणाबाजी झाली असती, निदर्शने झाली असती इत्यादीपेक्षा अधिक काय? हा जमाव हिंसक झाला असता तर कायदा वा सुव्यवस्थेचे कारण पुढे करत आंदोलकांस ताब्यात घेण्याचा अधिकार सरकारला होताच. पण आंदोलनास भविष्यात हिंसक वळण लागेल म्हणून वर्तमानात नागरिकांचा आंदोलनाचा अधिकारच काढून घेणे न्याय्य कसे? एखादी व्यक्ती आंदोलनासाठी घराबाहेर पडल्यावर कदाचित गैरकृत्य करू शकते; सबब तिला घरातून बाहेर पडूच देऊ नका अशी अरेरावी सरकार करू शकत नाही. तसा अधिकारच सरकारला नाही.

तरीही तो आहे असे मानून सरकारने दडपशाही केली आणि अक्षरशः हजारो तरुणांना डांबून टाकले. याची अजिबात गरज नव्हती. त्यातही 'सीजेपी'चे अभिजित दीपके आणि अन्यांस ज्या पद्धतीने सरकारने 'उचलले' ते अत्यंत निषेधार्ह होते. हे तीन तरुण जाहीर पूर्वकल्पना देऊन दिल्लीकडे निघालेले होते. त्यांचे विमान दिल्लीत उतरल्यावर आणि विमानात पोलीसफाटा घुसवून त्यांना ताब्यात घेण्याचा उद्योग सरकारी सामर्थ्याचे निर्लज्ज प्रदर्शन घडवणारा होता. विमान म्हणजे काही रेल्वे वा बस नव्हे की ज्यातून उतरल्यावर पळून जाण्याची संधी असते. आणि असे पळून जाण्याचा या तिघांचा इरादाही नव्हता. तरीही अन्य प्रवाशांच्या सोयी/ गैरसोयीचा कसलाही विचार न करता सरकारने या तिघांना विमानात घुसून ताब्यात घेतले. यात कसले शौर्य?

या असल्या वर्तनामुळे दहशत निर्माण होऊन संभाव्य निदर्शने टळतील असे सरकारला वाटत असेल तर तो निव्वळ भ्रम ठरेल. चांगल्या पालकत्वाच्या सूत्रात 'प्राप्ते तु षोडषे वर्षे; पुत्रे मित्रवदाचरेत' असा सल्ला आपल्या संस्कृतीत आहे. मुलगा १६ वर्षांचा झाला की त्यास मित्रवत बरोबरीच्या नात्याने वागवावे असा त्याचा अर्थ. अशा तरुण पोरावर हात उचलण्याचा प्रमाद पालकांकडून घडला तर वडिलांच्या खांद्याला लागत असलेला हा मुलगा त्यांचा हात धरू शकतो किंवा कोडगेपणाचे दर्शन घडवत 'आणखी मारा' असेही म्हणू शकतो. असा वयात आलेला मुलगा प्रसंगी वडिलांची पत्रास न ठेवण्याचा धोका आपल्या संस्कृतीनेच दाखवून दिला असेल तर ही वयात आलेली पोरे सरकारची काय पत्रास ठेवणार? या सरकारातील संस्कृताभिमानींस तरी ते ठाऊक हवे होते.

अशा तरुणांवर आपला वडिलकीचा अधिकार गाजवायचा तर त्यासाठी केवळ 'वडील' असणे पुरेसे नसते. हे वडील असणे आपल्या वर्तनातून दाखवून द्यावे लागते. तसे नसेल तर पुढची पिढी कोणीतरी केवळ आधी जन्मला इतक्याच मुद्द्यावर अधिकार गाजवू पाहणार्यास त्याची रास्त जागा दाखवून दिल्याखेरीज राहात नाही. सीजेपीचे आंदोलन हेच दाखवून देत आहे. आपल्या भवतालातील घटनांमुळे हे तरुण/तरुणी अस्वस्थ आहेत. अशावेळी त्यांच्या अस्वस्थतेस संयतपणे वाट काढून देणे, ही वाफ सुरक्षित मार्गाने बाहेर पडू देणे यातच शहाणपण असते. त्याचे अस्तित्व सरकारी कृतीतून तरी दिसत नाही. परिणामी मिळेल त्या मार्गाने या आंदोलनास आणि त्याहीपेक्षा आंदोलकांस चिरडण्याचा प्रयत्न सरकारने केला. तो दोन प्रकारे अंगाशी आला.

पहिल्यांदा सर्वोच्च न्यायालयाकडून चपराक सहन करावी लागली. रस्ते वाहतूक रोखणारे सर्व अडथळे दूर करा, रेल्वे/मेट्रो सेवा पूर्ववत करा, इंटरनेट सेवेत खंड पडता नये, उगाच कोणास बेकायदा ताब्यात घेऊ नका इत्यादी आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. त्यातून न्यायपालिकेच्या जिवंतपणाचे दर्शन तर घडलेच; पण सरकारच्या अनिर्बंधतेवर अंकुश ठेवण्याची गरज सर्वोच्च न्यायालयासही वाटली हे दिसून आले. वकिलांपासून पत्रकारांपर्यंत मिळेल त्यावर सरकारने आपला अधिकार अकारण गाजवला. हे सर्व आंदोलक होते, असे सरकार म्हणू शकते. पण आंदोलक असणे हा काही गुन्हा आहे की काय? सनदशीर मार्गाने व्यक्त होण्याचा अधिकार आपली राज्यघटना देते. त्यास आडकाठी करून सरकारने स्वहस्ते अवलक्षण करून घेतले.

दुसरा मुद्दा या आंदोलनाच्या प्रसरणाचा. आपली अमानुष ताकद वापरून सरकार दिल्ली कडीकुलुपात बंद करू शकते. एका दिवसात सहा-सात हजारांस ताब्यात घेऊ शकते. पण किती दिवस? दिल्ली बंद होईलही. देशाचे काय? हे प्रश्न महत्त्वाचे अशासाठी की हे आंदोलन दाबण्याचा प्रयत्न जितक्या अधिक प्रमाणात दिल्लीत केला जाईल त्याच्या कित्येक पट अधिक हे आंदोलन दिल्लीबाहेर पसरेल. एखादे जंतर-मंतर प्रतिबंधित क्षेत्र करता येईल. पण तसे केल्यास गावा-गावांत आणि शहरा-शहरांत अनेक जंतर-मंतर तयार होतील आणि भविष्याच्या प्रतीक्षेतील स्थानिक त्या त्या ठिकाणी आंदोलनांची राळ उडवून देतील. तेव्हा आपल्या वर्तनातून जंतर-मंतरचे हे अंतर सरकारने कमी करू नये हे शहाणपणाचे.

# खाद्यपुर्तीसाठी अन्नाचा एक-एक कण; सोबतच पाणी व निसर्ग वाचविण्याची गरज

विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील "उपासमारी" संपुष्टात येईल. खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ आक्टोंबर १९४५ ला "खाद्य व कृषि संघटन" (एफएओ) ची स्थापणा केली. "फॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश" (एफएओ) ने १६ आक्टोंबर १९७९ पासून "विश्व खाद्य दिवस"साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासुन जगात "आंतरराष्ट्रिय विश्व खाद्य दिवस" साजरा केल्या जातो. या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची (उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरूक करणे. उपासमारी, कुपोषण व गरीबीच्या विरूद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करणे. उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरू आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे. विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आनणे. परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की, या कार्यक्रमाच्या इतके वर्षांनंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवण सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. "अन्न हे पुर्ण ब्रम्ह" म्हटल्या जाते. कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असतेच. त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे. अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते व निसर्गाचे संतुलन टिकवण्यासाठी वृक्षांची गरज असते. त्याचबरोर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर व निसर्गावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे. कारण पाणी राहिले तरच अन्नाचे उत्पादन होवु शकते. १६ आक्टोंबर संपूर्ण जग "विश्व खाद्य दिवस"म्हणुन साजरा करतात. कारण खाद्यांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मिळवीण्यासाठी का धावपळ करतो?, मोल-मजुर, कामगारांना काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो "वितभर पोटाची खळगी भरणे" कारण काहींना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे याला नाकारता येत नाही. करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात उपासमारीची समस्या ओढावली होती. कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता. त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली होती. या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले. अशाप्रकारचे उग्ररूप करोणा काळात दीसुन आले. जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातुन घाम गाळतो व शेती पिकवितो. तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या "पोटाची खळगी" भरते. म्हणुनच शेतकऱ्यांना "अन्नदाता" म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येवु शकते. परंतु मानवजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे सर्वप्रथम १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी "शतशत प्रणाम" करतो. कारण ऊन, पाऊस, थंडी, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो. भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच "कृषिप्रधान देश"परंतु गेल्या ७९ वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी अत्यंत दुःखी असल्याचे दिसून येते. कारण आजच्या परिस्थितीत देशातील अनेक शेतकरी कोरड्या दुष्काळाशी सामना करीत आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही. सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही. त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते. आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे. परंतु "आर्थिकदृष्ट्या कंगाल" व शुन्य आहे. कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल, व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करतांना दिसतात. आज व्यापाऱ्याजवळ, राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला, सोने-नाने, चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी "भोपळा" आल्याचे दिसून येते. कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या ७९ वर्षांपासून आपण पहात आहोत. त्यामुळे आज शेतकरी वर्ग मागासलेला आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता भासू दिली नाही. परंतु चीनमध्ये १९७० मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते. म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप, कीडे-माकोडे व अन्य प्राणी खायला सुरुवात केली. चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्राण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली. अशा कठीण परिस्थितीतुन जावुनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे. परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पुर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता व एकनिष्ठता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊनच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात. आजही भारतात मेळघाट सारख्या व अतिदुर्गम भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का?याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे. आज भारतात उलटी गंगा वाहतांना दीसते देशातील ७० टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे. परंतु आजही भारतीय शेतकरी गरीब आहे. याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांचे फक्त रक्त पिण्याचे काम केल्याचे दिसून येते. त्यामुळेच आज भारतात अनेक भागातील अन्नदाता शेतकरी आत्महत्यां करतांना दिसतो. कारण त्यांची संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते. आतातर वाढते प्रदुषण, ग्लोबल वॉर्मिंग व अलनिनोच्या प्रभावामुळे मोठ्या प्रमाणात हवामानात बदल झाल्याने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत आनुण ठेवले आहे. विश्न खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकरी सरकारला विचारते की मुठभर नगरसेवक, आजी-माजी आमदार-खासदार व मंत्री मेहनत न करता पाच वर्षात करोडपती व अरबोपती कसेकाय होतात? राजकीय पुढारी शेतकऱ्यांपेक्षा एवढा मोठा आहे का?की त्याला गलेलठ्ठ पगार, पेन्शन, इतर भत्ते सरकार देते व शेतकऱ्यांना भोपळा देते. हे लोकशाहीच्या देशात चालय्य तरी काय?सर्व राजकीय पुढारी सांगतात की आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत. समान अधिकार, समान न्याय असे खोकले आश्वासन देतात. परंतु आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारीच शेतकऱ्यांचा घात करतांना दिसत आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या प्रती जागरूकता दाखवुन विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना सवोतीपरी मदत केली पाहिजे. आंतराष्ट्रिय माहिती नुसार जगात "उपाश्यापोटी" झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येत आहे. संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटना नुसार २००२ च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत १४० टक्याने भारीभरकम वाढ झाली आहे. यामुळे डिसेंबर २००७ पासुन ४० देशांना खाद्यांन्न संकटाचा सामना करावा लागत होता. सध्या गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध भयावह स्थितीमध्ये आहे आणि आणि आता अचानक इजरायल-हमास-हिज्बुल्ला-इराण-अमेरिका यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे. यामुळे युध्दाचा भडका महाभयानक स्थितीत आहे. याचा परिणाम अन्नसाठ्यावर होवून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे व पुढे आणखी भयावह परिस्थिती होऊ शकते. "भारतीय खाद्य निगमने" स्वतः कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील ५० करोड रुपयांचा अनाज म्हणजे १०. ४० लाख मीट्रिक टन पर्यंत अनाज सडतो किंवा खराब होतो. हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर, दुःखद व चिंताजनक बाब आहे. कारण खराब होणारे अन्न-धान्य प्रत्येकवर्षी सव्वा करोड लोकांची भुक मीटवु शकते. परंतु भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की शेतकऱ्यांनी मेहनतीने तयार केलेला लाखो टन अनाज सडतो आणि यामुळेच भुकमरीची समस्या उद्भवत आहे याला नाकारता येत नाही. यामुळेच भारतात करोडो लोक उपाश्यापोटी झोपतांना दीसतात. भारताची हेही समस्या आहे की सहा वर्षांखालील ४७ टक्के मुले कुपोषणाची शिकार होत आहे. एफएओच्या माहिती नुसार भारतात २००८ मध्ये २० करोड १० लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते. ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या २०२३ च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्व भुकमरी सुचकांकमध्ये १२५ देशांच्या तुलनेत १११ वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. या उलट भारताच्या शेजारील देशांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती भारतापेक्षा चांगली आहे यात पाकिस्तान- १०२, बांगलादेश-८१, नेपाळ-६९, श्रीलंका -६० व्या स्थानावर आहे. भारतात सर्वेमध्ये हेही लक्षात आले की लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते. याला कोठेतरी रोखलेच पाहिजे. आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कण वाचवीण्याची गरज आहे. आज अन्नाचा प्रत्येक दाना महत्वाचा आहे. तेव्हाच म्हणतात "दाने दाने पे लिखा है, खाने वाले का नाम" या म्हणीची पुर्ततः होवु शकते. आज १४५ कोटी जनतेचे दायीत्व बनते की अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे. विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी १४५ कोटी जनतेला विनंती करतो की "अन्नाचा एक-एक कण वाचवीण्याची नीतांत गरज आहे. कारण देशातील वाढती लोकसंख्या, जगातील युद्धजन्य परिस्थिती, बदलते हवामान व अलनिनोचा प्रभाव पहाता अन्न-धान्याचे जतन करने अत्यंत गरजेचे आहे. कारण भारतात बालकांच्या कुपोषणाची स्थिती अत्यंत वाईट आहे. त्याचप्रमाणे मी सरकारला आग्रह करतो की अन्न-धान्याचा काळाबाजार ताबडतोब रोखला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवरल्या पाहिजे. तेव्हाच विश्र्व खाद्य दिवसाला खरे महत्व येईल. संपुर्ण जग एकीकडे खाद्यांनासाठी आठा-पीटा करून वन-वन हिंडत आहे तर दुसरीकडे संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसल्याचे दिसून येते. म्हणजेच आज जगात खाद्यान्ना पेक्षा, निसर्गापेक्षा व पाण्यापेक्षा दारूगोळ्याला जास्त महत्व दील्याजात आहे. याला कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवू शकतो. याकरिता जीवन जगण्यासाठी खाद्यांनाकडे व निसर्ग वाचवण्यासाठी प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण, भुकमरी याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.

जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो. नं. ९९२१६९०७७९, नागपूर

# जिल्हा रुग्णालयात 23 बालकांवर मोफत शस्त्रक्रिया




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य व गरजू रुग्णाना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सोलापूर जिल्हा रुग्णालयात एकूण 18 बालकांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

सेवा संकल्प अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (फ्ह्रड), जिल्हा शीघ्र हस्तक्षेप निदान व उपचार केंद्र आणि जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांसाठी मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून विविध आजारांनी ग्रस्त असलेल्या बालकांवर आवश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

या शिबिरामध्ये हर्नियाच्या 2, हायड्रोसीलच्या 2, टंग टायच्या 12, तसेच हाताच्या मनगटाजवळील सिस्टच्या 1, आणि उजव्या डोळ्यावरील सिस्टच्या 1, अशा एकूण 18 शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्या.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना आरोग्यविषयक उपचार व शस्त्रक्रियांचा लाभ उपलब्ध होत असून, त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील उपचाराचा आर्थिक भार कमी होण्यास मदत होत आहे. बालकांना वेळेवर निदान व योग्य उपचार मिळावेत, तसेच त्यांचे आरोग्य सुधारावे, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. नागरिकांनी आपल्या पात्रतेनुसार आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी केले आहे.

# भाजपाच्या पसंतीला उतरलेले कौस्तुभ गावडे शिक्षक मतदाराच्या पसंतीला उतरणार

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे शिक्षक मतदार संघातील यंदाची निवडणूक बहुरंगी आणि बहुरंगी अशी तिरंगी लढत पहावयास मिळत आहे. भाजपाच्या कित्येक निष्ठावंत शिक्षक कार्यकत्यार्ला या निवडणुकीला आपल्याला उमेदवारी मिळावी म्हणून असंख्य कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले परंतु उमेदवारीची माळ कोल्हापूर जिल्ह्यातील कौस्तुभ गावडे यांच्या गळ्यात पडली.

कौस्तुभ गावडे भाजपाचे कार्यकर्ते असून ते स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये संचालक आहेत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विविध जिल्ह्यांमध्ये असंख्य शाळा कॉलेजेस असून या शाळा कॉलेजेस मधील शिक्षक मतदारांनी पाठिंबा आणि मतदान मिळण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता असल्यामुळे कौस्तुभ गावडे या संधीचा लाभ कितपत उठवता येणार हे पाहावे लागेल.

खासदार धनंजय उर्फ मुन्ना महाडिक यांचा पाठिंबा त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे मंत्री महोदय चंद्रकांत पाटील यांचा पाठिंबा व मार्गदर्शन आणि असंख्य शिक्षक मतदारांचा पाठिंबा कौस्तुभ गावडे यांना असल्यामुळे विजयाची लाभणार की काय असे



चित्र सद्यस्थितीला दिसून येत आहे.

कोल्हापूर जिल्हा आणि पुणे जिल्ह्यामध्ये त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यामध्ये भाजपाचे आमदार खासदार असल्यामुळे या भाजपा नेत्यांचे पाठबळ व पाठिंबा भाजपा उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या पाठीशी असल्यामुळे ही निवडणूक सहज जिंकू शकतात अशी शक्यता सद्यस्थितीला दिसून येत आहे.

पुणे शिक्षक मतदार संघामध्ये पाचही जिल्ह्यामध्ये भाजपाचे वर्चस्व असल्यामुळे त्याचप्रमाणे त्या जिल्ह्याचे पालकमंत्री आणि त्या जिल्ह्यातील सर्व भाजपा आमदार पुणे शिक्षक मतदार संघातील भाजपाचे उमेदवार कौस्तुभ गावडे हे निवडून आणण्यासाठी प्रयत्न शील असल्याचे दिसून येत आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत हे पुन्हा एकदा आमदारकीसाठी प्रयत्नशील आहेत. पुणे शिक्षक मतदार संघात आमदारकीचा अनुभव असलेले ते उमेदवार असल्यामुळे ते कितपत सरशी ठरतात हे देखील पाहावे लागेल. सोलापूर जिल्ह्यातील दत्तात्रय सावंत याच्या उमेदवारी बरोबरच भाजपाचे दुसरे निष्ठावंत कार्यकर्ते डॉ. बी पी रोंगे हे देखील भाजपा विरोधात बंड करून आपली अपक्ष उमेदवारी दाखल केलेली आहे प्रचाराची एक फेरी त्यांनी संपूर्ण मतदारसंघांमध्ये पूर्ण केलेली आहे. शिक्षक मतदारांच्या कडे ते आपली बाजू त्याचप्रमाणे शिक्षकांचा साठी आपण काय प्रयत्न करणार आहोत याचे देखील ते आश्वासन देत आहेत. भाजपा पक्षाविरोधात बंड उभारून त्यांनी अपक्ष निवडणूक लढवण्याची ठरवल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील दोन शिक्षकांमध्ये मताची विभागणी ही मोठ्या प्रमाणात होणार आहे हे स्पष्ट दिसून येत आहे.

काही शिक्षक मतदार डॉ. बीपी रोंगे यांची अपक्ष उमेदवार डॉ. बीपी रोंगे यांचीही अपक्ष उमेदवारी दत्तात्रय सावंत यांची मतं खाण्यासाठी उभी केलेली उमेदवारी असून भाजपाचे कौस्तुभ गावडे यांच्या पथ्याशी पडणार आहे अशी देखील चर्चा शिक्षक मतदारांच्या मध्ये सुरू आहे.

पान १ वरून

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी...

मतदारांची संख्या २ हजार ५४९ वर पोहोचली आहे. यामध्ये ३२१ वैयक्तिक मतदार असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने दिली.

दरम्यान, माढा तालुक्यातील ६२ दूध संस्थांच्या मतदार यादीसह इतर तालुक्यांतील मतदार यादीवर काही जणांनी आक्षेप घेतला आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात धाव घेण्यात आली असून, या प्रकरणांवर अद्याप निर्णय झालेला नाही.

न्यायालयीन प्रकरणांचा निकाल लागल्यानंतर मतदार यादीत आणखी संस्थांचा समावेश होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील अंतिम मतदारसंख्येबाबत पुढील काळात चित्र स्पष्ट होणार आहे.

# तुकाराम मुंढेंची नजर आता मसाल्यातील...

मसाल्यांमध्ये आकर्षक दिसण्यासाठी वापरले जाणारे कृत्रिम रंग, औद्योगिक रंग किंवा अर्क काढलेल्या निकृष्ट दर्जाच्या मसाल्यांची भेसळ करण्यास सक्त मनाई आहे. मसाल्यांच्या निजंर्तुकीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या 'इथिलिन ऑक्साईड' या धोकादायक रसायनाच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. मसाले उत्पादन आणि साठवणुकीच्या जागी अत्यंत कडक स्वच्छता बाळगणे बंधनकारक आहे. साठवणुकीचा परिसर पूर्णपणे स्वच्छ आणि कोरडा असणे आवश्यक आहे. उत्पादनाच्या पॅकिंगवर दिशाभूल करणारे खोटे दावे करता येणार नाहीत. पॅकेटवर उत्पादन आणि पॅकिंगची अचूक तारीख स्पष्टपणे नोंदवणे बंधनकारक आहे.

**7 वर्षांपर्यंत जेल अन 10 लाखांपर्यंत दंड**

तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे की, हे नियम सर्व उत्पादक, विक्रेते, घाऊक व्यापारी आणि हॉटेल व्यावसायिकांना बंधनकारक असतील. अन्नात भेसळ करून नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्यांची अजिबात गय केली जाणार नाही. अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 नुसार या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाई केली जाईल. यामध्ये दोषी आढळल्यास 1 वर्ष ते 7 वर्षांपर्यंतचा कारावास आणि 1 लाख ते 10 लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

# विजाभज, विमाप्र व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी 30 नोव्हेंबरपर्यंत अर्ज करावेत

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) आणि इतर मागासवर्गीय (इमाव) विद्यार्थ्यांसाठी विविध मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल (National Scholarship Portal – NSP) तसेच महाडीबीटी २.० पोर्टलवर विहित मुदतीत अर्ज भरावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

**NSP पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजना**

राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय मुलींसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना उपलब्ध आहे.

याशिवाय, पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या इयत्ता पहिली ते दहावीतील पात्र विद्यार्थ्यांसाठी PM YASASVI Pre-Matric Scholarship योजना राबविण्यात येत आहे.

**महाडीबीटी २.० पोर्टलवरील योजना**

महाडीबीटी २.० पोर्टलवर राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या व संबंधित महाविद्यालयाशी संलग्न वसतिगृहात राहणाऱ्या विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता, तसेच इमाव, विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना राबविण्यात येत आहेत.

यासोबतच इमाव, विजाभज व विमाप्र प्रवगार्तील विद्यार्थ्यांसाठी खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक प्रशिक्षण शुल्काची परतफेड करण्यात येते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटिंग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अन्नछत्र मंडळाच्यावतीने 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद' रुपी खुराकाचे कीट वाटप

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद' रुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत न्यासाकडून ऑक्टोबर महिन्यातील ७७ कीटचे वाटप गुरुवारी करण्यात आले.

तालुक्यातील जे पैलवान कुस्ती सरावासाठी कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी आहेत अशा कुस्तीगरांसाठी न्यासाकडून गत मकर संक्रांतीच्या दिवशी (जानेवारी - 2024या महिन्यात) सदरचा उपक्रम सुरू करण्यात आला होता. प्रारंभी ५० जणांना किट देण्यात आले होते.

### अमोलराजे ग्रुप पैलवानांचा डंका

यामध्ये ८ पैलवान राज्यासह परराज्यात राष्ट्रीय पातळी पर्यंत चमकले आहेत. यामध्ये नेत्रदीपक प्रगती पै.पुरुषोत्तम कुलकर्णी, पै. शशिकांत जुमाले, पै.मशीद शेख, पै.विकास बनसोडे यांनी राज्य हिंद केसरी स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे. महिला पैलवाना मध्ये पै. अंकिता भिवा जाधव महिला राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेमध्ये गोल्ड तर पै. सावित्री बनसोडे हिने देखिल गोल्ड मिडल पटकविले आहे. या बरोबरच वेदिका सासणे हिने हरयाणा, राजस्थान, रांची, झारखंड येथील राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे. या बरोबरच कु. नागम्मा बजे हिने बांबू उडीत राष्ट्रीय स्तरावर विविध पारितोषक मिळविले आहे. तर प्रदीप माने याने बालेवाडी क्रीडा नगरीत धावण्याचा सराव करीत असून, तो शासनाच्या मिशन लक्षवेध योजनेत समावेश असून त्याने राष्ट्रीय अंतराष्ट्रीय स्पर्धेकरिता सरावार्थ पुणे येथे प्रशिक्षण घेत आहे.

तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माध्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७७ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै.महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी न्यासाचे सचिव शामराव मोरे, भिवा जाधव, पै. महेश कुलकर्णी, अतिश पवार, प्रवीण घाटगे, शुभम सावंत, यश विभूते, शहाजी यादव, एस.के. स्वामी, बाळासाहेब घाटगे सतीश महिंद्रकर, नामा भोसले, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, शिव स्वामी, अनिल बिराजदार, समर्थ घाटगे, रोहित कदम, राहुल गेजगे, पिंटू हळ्ळूरे, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



**७७ जणांना ३२ महिन्यात २ हजार २७५ किटचे वाटप**

तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीशोप, खसखस, इलायची, धने आदि पदार्थांचे कुस्तीगीरांसाठी श्रींचा प्रसाद रुपी खुराकात या जीनसांचा समावेश आहे. प्रारंभी ७ महिने ५० जणांना त्यानंतर मागणी वाढत गेल्याने ७ महिन्यानंतर २७ पैलवान वाढल्याने आजतागायत ३२ महिन्यात २ हजार २७५ किटचे वाटप करण्यात आले आहे.

# कबड्डी स्पर्धेत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयाचे यश

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत सोनी महाविद्यालय, सोलापूर येथे दि. ६ व ७ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयाच्या मुली व मुलांच्या संघांनी घवघवीत यश संपादन केले. मुलींच्या संघाने सलग चौथ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावला, तर मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला.



या यशाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील, मार्गदर्शक संचालक डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील, मार्गदर्शक संचालिका सौ. उर्वशीराजे धवलसिंह मोहिते-पाटील व प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे म्हणाले, 'खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसित होतो. मुलींच्या संघाने सलग चार वर्षे मिळविलेले यश अभिमानास्पद असून, मुलांच्या संघाची कामगिरीही कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात अशीच प्रगती करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे.'

खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतेश पाटील, प्रा. नारायण माने व वरिष्ठ लिपिक सूर्यकांत सालगुडे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# क्षयरोग निर्मूलनासाठी जोश उपक्रमाची उत्साहात सुरुवात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** टीबी मुक्त भारत अभियानाला गती देण्यासाठी आणि क्षयरोग निर्मूलनात जनभागीदारी व युवाशक्तीच्या सक्रिय सहभागातून राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत सोलापूर महानगरपालिके तर्फे शहरात जोश उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

JOSH (Joint Squad For Health Teams) टीबी निर्मूलनासाठी युवक आहेत तयार असा प्रेरक नारा यावेळी देण्यात आला. या जोश टीममध्ये एनएसएस, एनसीसी, माय भारत स्वयंसेवकांचा समावेश आहे. क्षयरोग निर्मूलनामध्ये स्वयंसेवकांची भूमिका अत्यंत महत्वाची असून सार्वजनिक ठिकाणी रॅली, पोस्टर प्रदर्शन, पथनाट्याद्वारे सामाजिक प्रबोधन, सोशल मिडियाचा वापर करून टीबी जनजागृतीचे संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे आणि टीबी मुक्त भारत अॅपचा प्रभावीपणे वापर करणे, निक्षय मित्र बनविणे,फुड बास्केट वाटप,आयुष्मान आरोग्य शिबिरामध्ये सहकार्य करणे याबरोबरच स्वच्छता, नशामुक्तीचे संदेश देणे इत्यादी बाबींची शहर क्षयरोग केंद्राद्वारे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या क्षयमुक्तीच्या जनआंदोलनात शहरवासीयांनी सहभागी होण्याचे आवाहन आयुक्त डॉ.सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, आरोग्याधिकारी डॉ.राखी माने, शहर क्षयरोग अधिकारी डॉ.प्रसाद कुमार यांनी केले.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत राज्यातील उत्कृष्ट क्रीडापटू तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या दोन वर्षांच्या पुरस्कारांसाठी पात्र खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, महिला क्रीडा मार्गदर्शक, दिव्यांग खेळाडू आणि साहसी उपक्रमात सहभागी झालेल्या खेळाडू व व्यक्तींनी दि. १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहरे यांनी केले आहे.

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तींना जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांना उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, महिला क्रीडा मार्गदर्शकांना जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, तसेच खेळाडू, दिव्यांग खेळाडू आणि साहसी उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शासन निर्णय दि. २९ डिसेंबर २०२३ व दि. २५ जानेवारी २०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराची सुधारित नियमावली २०२३ निश्चित करण्यात आली आहे. या नियमावलीनुसार सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षांच्या पुरस्कारांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक व पात्र अर्जदारांनी दि. १२ ऑक्टोबर २०२६ ते दि. १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत क्रीडा विभागाच्या "https://sports.maharashtra.gov.in" (https://sports.maharashtra.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटे ५९ सेकंदांपर्यंत आहे.

तरी पात्र खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमांत सहभागी झालेल्या व्यक्तींनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करून या पुरस्कारासाठी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहरे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.


## खरेदिपूर्व जाहीर नोटीस

तमाम सोलापूर जिल्हयातील जनतेला कळिवणेत येते की,

मिळकतीचे वर्णन- तुकडी व जिल्हा परिषद सोलापूर पोटतुकडी व तालुका आणि पंचायत समिती करमाळा, ग्रामपंचायत आवाटी हद्दीतील मौजे आवाटी येथील विहीर बागायत शेतजमीन चे वर्णन खालीलप्रमाणे, अ) क.ग.नं. ३१/१/अ पैकी क्षेत्र ०० हे. ९० आर आकार १ रु.४६ पैसे यासी चतुः सिमा, पुर्व - गट नं ३१/१/अ पैकी शिल्लक जमीन, पश्चिम - गट नं ४० उत्तर- गट नं ३२ यांची जमीन, दक्षिणला- गट नं ३१/१/ब व ब) क.ग.नं. ३१/१/ब पैकी क्षेत्र ०० हे.९० आर आकार १ रु.४६ पैसे यासी चतुः सिमा, पुर्व- गट नं ३१/१/ब पैकी शिल्लक जमीन, पश्चिम - गट नं ४० उत्तर- गट नं ३१/१/अ, दक्षिणला-गट नं ३१/१/क यांची जमीन येणे प्रमाणे चतुः सिमापुर्वक मिळकत आतील गट नं ३१/१/ब मधील चालू पाण्याची विहिरीमध्ये माझ्या निम्मा हीसा असून त्यापैकी दोन दिवस १/४ हीसा इले. डीपि, रस्ता इत्यादि, झाड - झुडूप, ताली वगैरे सर्व तद्रभुत वस्तुसह.

सदरची मिळकत ही सौ भिवराबाई दत्तू शिंदे यांच्या खरेदी मालकी हक्काची आहे. सौ भिवराबाई दत्तू शिंदे यांना त्यांच्या प्रपंचिक, आर्थिक, कायदेशीर, अडचणी सोडविण्यासाठी,ओषध उपचारासाठी,दुसरी जमीन घेण्यासाठी पैशाची गरज असल्याने सदरची मिळकत जाहीरपणे विक्रीस काढलेली होती. सदरची मिळकत आमचे अशिल अफरोजा अलिम पठाण यांना माहीत झाल्याने त्यांनी सौ भिवराबाई दत्तू शिंदे यांचे बरोबर बैठक घेवून सदर जमीन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी सौ भिवराबाई दत्तू शिंदे यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचा हक्क, अधिकार, बोजा, गहाण, दान, चोळी बांगडी, पोटगी इसार, साठेखत, खरेदीखत, कोर्ट केसेस, बँकेच्या केसेस, इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्क संबंध असल्यास त्यांनी आमचे अशिल यांना अगर माझे ऑफिस दिवाणी कोर्टा समोर करमाळा येथे समक्ष भेटून नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाचे आतमध्ये कळवून, तशी त्यांची खात्री करून द्यावी. तसे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकतीत कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी समजून आमचे अशिल हे खरेदी करतील. मुदतीनंतर कोणाचाही कसलीही तक्रार अगर हरकत आल्यास ती आमचे अशिलावर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. मग त्याच्या होणाऱ्या खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे. ता. १५/१०/२०२६

**सही/-**
**आमचे अशिल**
**अफरोजा अलिम पठाण**
**रा. आवाटी ता. करमाळा**
**जि. सोलापूर**

**सही/-**
**अशिलांतर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. विशाल दादासाहेब घोलप**
**बी.ए. (ऑनर्स) एलएल. बी. रा. खंदकरोड, करमाळा, ता. करमाळा**
**जि. सोलापूर मो. ९४०४६९२४४०**


# सोलापूरात विशेष वाहन तपासणी मोहीम; १९३ वाहनांची तपासणी

## ६५ वाहनांना चलन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन आणि मोटार वाहन कायद्यातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने विशेष वाहन तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण १९३ वाहनांची तपासणी करण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६५ वाहनांना चलन (मेमो) बजावण्यात आले.

या कारवाईतून एकूण २४.६० लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला. तपासणीदरम्यान भंगार रिक्षा, अल्पवयीन चालकांकडून चालविण्यात येणारी वाहने, उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकपट्टी (एचएसआरपी) नसलेली वाहने, वाहन चालविण्याचा वैध परवाना नसलेले चालक, वैध योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस) नसलेल्या रिक्षा, विमा नसलेली वाहने तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरुद्ध मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

ही मोहीम प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांच्या निर्देशानुसार, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. मोटार वाहन निरीक्षक संतोष झगडे, दिनेश ढोकणे, गणेश तपकिरे, प्रणव चव्हाण, श्रेयस सरगे आणि धनंजय थोरे यांनी आपल्या पथकातील सहायक मोटार वाहन निरीक्षकांसह या मोहिमेत सहभाग घेतला.

वाहनधारकांनी आपल्या वाहनांची आवश्यक कागदपत्रे वैध व अद्ययावत ठेवावीत. वाहनासंबंधी लागू असलेल्या सर्व कायदेशीर तरतुदींचे पालन करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, विजय पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.


## जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि.कि.अर्ज नं. १७७/२०२६

**मोहोळ येथील मे.ज्यूडिशियल मजिस्ट्रेट वर्ग-१ सो, यांचे कोर्टात-**

विजयकुमार त्रिंबक कांबळे, } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामपंचायत अधिकारी,दादपूर, ता.मोहोळ,जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांची मुलगी १) कु. समृध्दी विजयकुमार कांबळे हिचा जन्म हा १०/०६/२०१२ रोजी तसेच दुसरी मुलगी २) कु. प्रगती विजयकुमार कांबळे हिचा जन्म हा २१/०७/२०१४ रोजी मौजे दादपूर, ता. मोहोळ येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतु त्यांच्या जन्माच्या नोंदी ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेल्या नाहीत. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलगी १) कु. समृध्दी विजयकुमार कांबळे २) कु. प्रगती विजयकुमार कांबळे यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत दादपूर, ता. मोहोळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता.१५/१०/२०२६

**लिपीक,**
**ज्यु.मॅ.वर्ग-१ मोहोळ.**

**ज्यु. मॅ.वर्ग-१**
**मोहोळ**


# कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी अक्कलकोटला द्या!

## अक्कलकोटसाठी पाच टीएमसी पाण्याची आ.सचिन कल्याणशेट्टी यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :** अक्कलकोट तालुक्यातील पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी निरा-भीमा खोऱ्याकडे वळविण्याच्या प्रस्तावित योजनेतून अक्कलकोटसाठी पाच टीएमसी पाणी मंजूर करावे, अशी मागणी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. या मागणीच्या अनुषंगाने भीमा नदीवरील उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाला द्यावेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

सांगली शहर आणि परिसरात दरवर्षी निर्माण होणाऱ्या पूरपरिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी कृष्णा नदीतील सुमारे ५० टीएमसी अतिरिक्त पाणी निरा-भीमा खोऱ्याकडे वळविण्याची योजना प्रस्तावित आहे. या योजनेचा लाभ अक्कलकोट तालुक्याला मिळाल्यास दुष्काळग्रस्त भागातील शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होऊ शकते. यासाठी आमदार कल्याणशेट्टी यांनी पुढाकार घेत



अक्कलकोटसाठी स्वतंत्र पाण्याची तरतूद करण्याची मागणी केली आहे.

अक्कलकोट तालुका कायमस्वरूपी दुष्काळप्रवण क्षेत्रात येत असल्याने येथे शेतीसाठी पाण्याची समस्या सातत्याने जाणवते. तालुक्यातील जलसंपदा विभागाच्या विविध लहान-मोठ्या सिंचन प्रकल्पांमध्ये दरवर्षी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध होत नाही. परिणामी, मंजूर पाणी वापरानुसारही शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे पाणी मिळत नसल्याने शेती उत्पादनावर आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर भीमा नदीतून उपलब्ध होणाऱ्या पुराच्या पाण्यातून पाच टीएमसी पाणी उपसा सिंचन योजनेद्वारे उचलून अक्कलकोट तालुक्यातील पाण्याची कमतरता असलेल्या सिंचन प्रकल्पांमध्ये सोडण्यात यावे, अशी भूमिका कल्याणशेट्टी यांनी मांडली आहे. पावसाळ्यात या प्रकल्पांमध्ये पुरेसा पाणीसाठा उपलब्ध झाल्यास त्याचा उपयोग शेतीसाठी करता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना मंजूर पाणी वापराचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

### उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यावर भर

कृष्णा खोऱ्यातील एकूण मंजूर पाणी वापरात वाढ न करता, उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षमतेने उपयोग करून अक्कलकोटसारख्या दुष्काळी भागाला दिलासा देता येऊ शकतो, असेही आमदार कल्याणशेट्टी यांनी पत्रात नमूद केले आहे. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा विभाग या मागणीवर काय निर्णय घेतात, तसेच सर्वेक्षण आणि डीपीआर तयार करण्याच्या प्रक्रियेला कधी सुरुवात होते, याकडे अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. ही योजना प्रत्यक्षात साकार झाल्यास तालुक्यातील सिंचन व्यवस्था बळकट करण्यासाठी आणि पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.


**आमच्याकडे केशर आंबा, हापूस,**
**मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे,**
**इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे**
**होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**
**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**
**संपर्क - 9422602337, 8317212037**



## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथम एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौडय्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आश्वासनाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी देऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) युपीतील एक लोकसभा मतदारसंघ २) आकाश, गगन ३) टेनिस स्पर्धेतील विश्वविजेता खेळाडू-*** फेडरर ४) नय उलट लिहा ५) महाराणा प्रताप यांच्या घोड्याचे नाव ६) बिल्डिंग (मराठीत) १०) वाईट सवय १२) धान्याचा ढीग १३) चालू दिवस, एक न्यूज चॅनल-** तक १५) मग्न, लीन, एकरूप होणे १७) आयपीएलमधील एक फलंदाज-*** अय्यर १८) विजेचे लोडशेडिंग (मराठीत) १९) गस्त घालणे, राखण करणे २१) एखाद्या गोष्टीतील रूची, छंद २३) एक म्हण-**** लंगडी गाय शहाणी २४) शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी एक संस्था २६) पावट्याप्रमाणे द्विदल कडधान्य २८) गुरांचे मांस विक्री करणारा २९) विषमच्या विरूध्दार्थी शब्द ३०) भिंतीवरील सरपटणारा प्राणी ३१) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द ३४) मन वळविण्याचा प्रयत्न ३८) भक्कम, कणखर ३९) आकाश (इंग्रजीत) ४०) डोक्याचे केस काळे करणे ४३) मनाला टोचणी लावणारे शल्य ४४) चपाती याच्यावर भाजतात ४५) प्रगती (हिंदीत) ४७) धातूचा तंतू, ४८) डोकेदुखीवर कपाळाला लावायचा मलम ४९) सर्व (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील एक संघ ५) महेंद्रसिंग धोनीचा आयपीएल विजेता संघ-*** सुपर किंग्ज ७) देवाचे नामस्मरण, ईशस्तवन ८) आठवड्याचे एकूण दिवस ९) किंमती वस्तू, ऐवज ११) अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष-*** ओबामा १४) व्यायाम, मेहनत १६) शर्यत (इंग्रजीत) १८) देवेंद्र फडणवीसांचा पक्ष २०) निवडणुकीत उमेदवाराला करतात ते **दान २१) इन्कमटॅक्स (मराठीत) २२) एक म्हण-*** तो वजीर २४) इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे २५) मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक २७) पौष्टीक, सत्वयुक्त २९) कामातून मिळालेली उसंत ३०) पैंजण (हिंदीत) ३२) सैफ अली खानची अभिनेत्री असलेली मुलगी ३३) पैसे (इंग्रजीत) ३४) जखमेवर लावायचे औषध ३५) सरावलेला, पटाईत ३६) पाणी पिण्याची तीव्र इच्छा ३७) वंदन, रामराम, अभिवादन ४१) पैसा, संपत्ती ४२) यश, सफलता ४३) सातत्याने, नेहमी, खंड न पडता ४६) गानसम्राज्ञी-** मंगेशकर ४८) स्वातंत्र्यापूर्वी स्वदेशीचे नारे देत ब्रिटिशांच्या गाडीसमोर आत्मबलिदान करणारे देशभक्त-** गेणू ४९) कुत्र्याचा जोडीदार ५०) नांदेड लगतचा एक जिल्हा ५१) स्वार्थ, हेतू

## सुडोकु - 78

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | | |
| | 8 | 1 | | 9 | 3 | | 4 | 5 |
| 4 | | | | 5 | | | 3 | 2 |
| 9 | | | 5 | | 4 | | 7 | 8 |
| | 5 | 8 | 3 | | | | | 9 |
| | | | 8 | 2 | | | | |
| 5 | | | 2 | 7 | | | 8 | 4 |
| 6 | | 4 | 1 | 3 | 8 | 2 | | 7 |
| 8 | | 2 | 9 | | | 6 | | |

# सीना माढा सिंचन योजना चालू ठेवण्यास जलसंपदामंत्री सकारात्मक : रणजीतसिंह शिंदे

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यासह माढा तालुक्यात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असून नागरिक व पशुधनासाठी पिण्याचे पाणी मिळावे व यापुढे रब्बी हंगामासाठी शेतीला पाणी मिळावे यासाठी सीना माढा सिंचन योजना पुढे चालू ठेवण्यात यावी तसेच उजनीतून भीमा नदीत तातडीने पाणी सोडून सर्व बंधारे भरून घ्यावेत अशी मागणी जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष तथा माढा तालुका भाजपाचे युवा नेते रणजीत सिंह शिंदे यांनी मुंबई येथे सह्याद्री अतिथी ग्रहावर झालेल्या बैठकीत जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे केली. पाण्याचे दुर्भिक्ष व गंभीर परिस्थिती विषयी तातडीने सकारात्मक कारवाई करण्याचे आदेश जलसंपदा मंत्री महोदयांनी प्रशासकीय विभागास दिले , याप्रसंगी माजी आमदार बबनदादा शिंदे देखील उपस्थित होते.

रणजीत शिंदे यांनी मंत्री महोदयांना माहिती दिली की मागील खरीप हंगामात सीना माढा सिंचन योजना अनेक कारणास्तव संथ गतीने चालू राहिली, अनेक भागात लिकेजेस झाले आहेत, अनेक ठिकाणी जॉईंट वॉल्स ना गळती लागलेली आहे, मोटारींच्या फुटबॉल वरती पाण्याचे प्रेशर कमी होत असल्यामुळे पूर्ण क्षमतेने डिलिव्हरी चेंबर पर्यंत पाणी पोहोचू शकत नाही व त्यामुळे लाभक्षेत्रातील अनेक गावांना या हंगामात पाणी पोहोचू शकले नाही तसेच या योजनेवर अवलंबून असलेले ओढे, तळी, लहान बंधारे भरून घेणे देखील अद्याप बाकी राहिले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी शेतात उभी असलेली ऊस फळबागा व चारावैरणीची पिके पाण्याअभावी जळून गेली आहेत तसेच नागरिक व पशुधनाला पिण्यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता आहे. या सर्व परिस्थितीत सीना माढा सिंचन योजना पाण्यासाठी व पुढील रब्बी हंगामातील पिके व चारावैरनीची पिके जगण्यासाठी कायमस्वरूपी चालू ठेवणे आवश्यक आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन जलसंपदा मंत्री महोदय विखे पाटील यांनी सकारात्मकता दर्शवून संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तातडीने आदेश दिले असल्याचे रणजीत शिंदे यांनी सांगितले.

याचप्रमाणे उजनीतून भीमा नदीत पाणी सोडणे बंद होऊन दीन महिना होऊन गेले आहेत,तसेच पावसाचा पत्ता नसल्यामुळे भीमा नदीतील बंधारे कोरडे पडले आहेत, नदी काठावरील अनेक गावे व वाड्यावस्त्यावरील पाणीपुरवठा योजना बंद पडल्या आहेत, शेतात उभी असलेली पिके जगण्यासाठी शेतकऱ्यांची कशीबशी धडपड चालू आहे, या सर्व कारणामुळे भीमा नदीय तातडीने पाणी सोडले पाहिजे असे मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले असत नामदार विखे पाटील यांनी जलसंपदा प्रशासकीय विभागा चे अधिकारी व सोलापूरचे जिल्हाधिकारी यांना पाणी सोडण्याचे आदेश दिले असल्याचे रणजीत शिंदे यांनी सांगितले.



**तर 38 ते 40 गावात पाण्याचे टँकर सुरू करावे लागतील..**

सीना माढा सिंचन योजना अनेक कारणामुळे संथगतीने चालत असल्यामुळे लाभक्षेत्रात सर्वत्र पाणी पोहोचले नाही, तसेच पिण्यासाठी पाणी मिळणे आवश्यक असल्यामुळे ही योजना यापुढेही चालू न ठेवल्यास या योजनेवर अवलंबून असलेल्या 38 ते 40 गावात पाण्याचे टँकर सुरू करावे लागतील अशी गंभीर परिस्थिती निर्माण होईल..

**- रणजीत शिंदे**

**...पालकमंत्र्यांची भेट ...**

यानंतर रणजीत शिंदे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांची भेट घेऊन त्यांनाही वस्तुस्थितीची कल्पना दिली असता त्यांनी सीना माढा सिंचन योजना यापुढेही पिण्याच्या पाण्यासाठी आणि रब्बी हंगामातील पिके जगवण्यासाठी चालूच राहील व तसेच येत्या एक-दोन दिवसाच्या आत उजनीतून भीमा नदीत पाणी सोडले जाईल व सगळे बंधारे भरून घेतले जातील असे नामदार जयकुमार गोरे यांनी शिंदे यांना आश्वासित कले.

# टंचाईग्रस्त गावांसाठी 20 टेम्पो ओला चारा आणि पाण्याचे टँकर रवाना

## पालकमंत्री गोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवप्रकाश कृषी विज्ञान मंडळाचा उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. अन्नदाता शेतकरी मोठ्या संकटाचा सामना करत आहे. भीषण दुष्काळी परिस्थितीत देगावच्या शिवप्रकाश कृषी विज्ञान मंडळाच्यावतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा वाढदिवस शेतकरी व पशुधनाला डोळ्यासमोर ठेऊन दत्तात्रय वानकर यांनी राबविलेला सामाजिक उपक्रम अत्यन्त स्थुत्य असून अन्य सामाजिक संघटनांनी शिवप्रकाश मंडळाचा आदर्श घेऊन दुष्काळामध्ये शेतकरी व जनावरांना मदत करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन, महापौर विनायक कोंड्याल यांनी केले.

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवप्रकाश कृषी विज्ञान मंडळाच्यावतीने गुरुवारी देगाव येथे दुष्काळग्रस्त शेतकरी बांधव आणि पशुधनासाठी टँकरद्वारे पिण्याचे पाणी व चारा वाटप करण्याचा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला होता .या उपक्रमाचे उदघाटन महापौर कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो,या भावनेतून वानकर परिवाराने सोलापूर जिल्ह्यात सर्वात प्रथम शेतकरी व पशुधनासाठी प्रथम पाऊल उचलले आहे.पालकमंत्री गोरे हे शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कायम झटत असतात, असेही महापौर यावेळी बोलताना म्हणाले.

सोलापूर जिल्ह्यात कधी नवे इतका मोठा दुष्काळ पडलेला आहे. शिवप्रकाश मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत शेतकरी व पशुधनासाठी उपक्रम राबवून पालकमंत्री जयकुमार गोरे याना खऱ्या अर्थाने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या असल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण म्हणाले.

यावेळी भाजप शराध्यक्षा रोहिणी तडवळकर, प्रभाग ६ चे भाजपचे पॅनल प्रमुख तथा नगरसेवक गणेश वानकर, आरोग्य समितीचे सभापती तथा नगरसेवक सुनील खटके, नगरसेविका सोनाली गायकवाड आणि नगरसेविका मृण्मयी गवळी, विमल कोरे, विठ्ठल वानकर, समर्थ वानकर, महादेव गवळी, शरद निकम, अर्जुन गायकवाड, भारत खाडे, दीपक भातलवंडे, गणेश रणदिवे, अरुण जाधव, संतोष कोरे, बिट्टू शिंदे, विष्णू जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.



**दुष्काळात वानकर परिवार धावला**

सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाची दाहकता मोठी आहे.समाजसेवक म्हणून वानकर परिवाराकडून बळीराजाला आधार देण्यासाठी चारा आणि पाण्याचा चांगला उपक्रम राबविण्यात आला आहे.मागील वर्षी आणि यंदासुद्धा दुष्काळामध्ये हा परिवार शेतकऱ्यांसाठी धावून आला आहे.पालकमंत्री जयकुमार गोरे यांना अभिप्रेत असलेला हा उपक्रम असल्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी यावेळी बोलताना सांगितले.

**६० टन चारा आणि तीन टँकर पाणी**

ग्रामीण भागात पाणीटंचाई निर्माण झाल्यास त्याचा सर्वाधिक फटका शेतकरी आणि पशुपालकांना बसतो. जनावरांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करणे, चाऱ्याची व्यवस्था करणे आणि दैनंदिन पशुपालनाचा खर्च भागविणे ही मोठी आव्हाने सध्या शेतकऱ्यांसमोर उभी ठाकली आहेत. अशा परिस्थितीत टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि चारा वाटप यांसारखे उपक्रम शेतकरी कुटुंबांना दिलासा देणारे ठरू शकतात. त्यामुळे शिवप्रकाश कृषी आणि विज्ञान मंडळाच्यावतीने २० टेम्पो ६० टन ओला चार आणि प्रत्येकी १२ हजार लिटरचे ३ पाण्याचे टँकरची व्यवस्था करण्यात अली आहे.उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे, पाकणी, बेलाटी, हिरज, शिवणी, पाकणी, डोणगांव, कवठे, तेलगाव, समशापुर, बसवेश्वर नगर, गणेश नगर तांडा, कोंडी, देशमुख वस्ती, आनंद नगर, डफळेकर नगर या ठिकाणी टंचाईग्रस्त गावात चार आणि पाण्याचे वाटप करण्यात येणार असल्याचे मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय वानकर यांनी सांगितले.

# जळीतग्रस्त कोळी कुटुंबाला महादेव कोगनुरे यांचा मदतीचा हात



**दक्षिण सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** बंकलगी येथील बसवराज गोविंद (ढोणज) कोळी यांच्या घराला गॅस सिलिंडरच्या स्फोटामुळे आग लागून संपूर्ण घर जळून खाक झाले. या दुर्घटनेमुळे कोळी कुटुंबावर मोठे संकट ओढवले. या घटनेची माहिती मिळताच एम. के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सागर सिमेंटचे महाराष्ट्र हेड महादेव कोगनुरे यांनी तातडीने दखल घेत संबंधित कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला.

एम. के. फाउंडेशनचे बंकलगी येथील काही सहकाऱ्यांनी दूरध्वनीद्वारे या घटनेची माहिती महादेव कोगनुरे यांना दिली. गावातील सामाजिक बांधिलकी जपण्याच्या भावनेतून संकटग्रस्त कुटुंबाला मदतीचा हात मिळावा, या उद्देशाने ही माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात आली. त्यानंतर कोगनुरे यांनी तत्परतेने कुटुंबाची भेट घेत मदतीचा खारीचा वाटा उचलला.

अचानक आलेल्या या संकटामुळे कुटुंबाचे मोठे नुकसान झाले असून, अशा कठीण प्रसंगी समाजातील दानशूर व्यक्तींनी आणि ग्रामस्थांनी एकजुटीने संकटग्रस्तांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. सामाजिक जाणीव, माणुसकी आणि परस्पर सहकार्याच्या भावनेतून केलेली मदत संकटग्रस्त कुटुंबाला नव्याने उभे राहण्यासाठी बळ देणारी ठरते.

या वेळी बंकलगी येथील रेवण सिद्ध कोणदे, राजशेखर सगरे, काशप्पा गुरुजी, मंत्रीशे गुरुजी, भाग्यांण्णा दुषवंत, चंदू कोणदे, नागनाथ कोणदे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# सासवड माळी शिक्षण संस्थेच्या व्हा.चेअरमनपदी डॉ. जाधव, सेक्रेटरीपदी बोरावके तर खजिनदारपदी पांढरे

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळीनगर येथील दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेच्या नूतन व्हाईस चेअरमनपदी डॉ.अविनाश राजाराम जाधव,नूतन सेक्रेटरीपदी रत्नदीप हनुमंत बोरावके व नूतन खजिनदारपदी कल्पेश उमेश पांढरे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.

येथील दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीची सन २०२६-२७ ते २०२८-२९ या कालावधीसाठी नुकतीच संचालक मंडळाची निवडणूक घेण्यात आली होती.या निवडणुकीनंतर सोमवार दि.१२ ऑक्टोंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे चेअरमन मोहन लांडे यांचे अध्यक्षतेखाली नूतन पदाधिकारी निवडीसाठी व विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी संस्थेच्या सर्व नूतन संचालक मंडळाची पहिली सभा घेण्यात आली.यावेळी नूतन संचालकांच्या झालेल्या सभेत संस्थेच्या व्हा.चेअरमनपदासाठी डॉ.अविनाश जाधव (भोंगळे), सेक्रेटरी पदासाठी रत्नदीप बोरावके व खजिनदार पदासाठी कल्पेश पांढरे यांच्या नावास सर्व उपस्थित संचालकांनी एकमताने पाठिंबा दिल्याने संस्थेच्या नूतन व्हा.चेअरमनपदी डॉ.अविनाश जाधव,नूतन सेक्रेटरीपदी रत्नदीप बोरावके व नूतन खजिनदारपदी कल्पेश पांढरे यांची एकमताने निवड झाली असल्याचे चेअरमन श्री.लांडे यांनी जाहीर केले.

या निवडीनंतर संस्थेचे चेअरमन मोहन लांडे व सभासद हेमंत रासकर, विनय नवले, विनोद पांढरे, घनश्याम भोंगळे, गणेश बोरावके यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचा व नूतन संचालकांचा सत्कार केला तसेच दि मॉडेल विविधांगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वतीने नूतन व्हा.चेअरमन डॉ.अविनाश जाधव, नूतन सेक्रेटरी रत्नदीप बोरावके, नूतन खजिनदार कल्पेश पांढरे तसेच नूतन संचालक केतन बोरावके, विक्रांत कुदळे, प्रीतम राऊत, रोहित गिरमे, अजय गिरमे श्रीमती मंजुषाताई झगडे, स्नेहाताई गिरमे या सर्वांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी डॉ.अविनाश जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रशालेचे प्राचार्य कलाप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे, पर्यवेक्षक सुनील जवरे तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# राष्ट्रीय स्पर्धेत टीम वज्राची दमदार कामगिरी; स्किडपॅडमध्ये उपविजेतेपद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथील विद्यार्थ्यांच्या ह्याटीम वज्राह्ने राष्ट्रीय स्तरावरील मॉर्फिन मोटरस्पोर्ट्स सिरीज सीझन २ या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत संघाने ऑल इंडिया रँकिंगमध्ये (AIR) सहावा क्रमांक पटकावला, तर स्किडपॅड प्रकारात उपविजेतेपद मिळवत पाच हजार रुपयांचे रोख पारितोषिक जिंकले.

कोयंबतूर येथील कोस्ट कार्टमेनिया येथे ४ ते ७ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या या स्पर्धेत देशभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला होता. वाहनाची रचना, तांत्रिक कौशल्य, सुरक्षितता, वाहन हाताळणी आणि ट्रॅकवरील कामगिरी अशा विविध निकषांवर संघांचे मूल्यमापन करण्यात आले. या स्पर्धेत टीम वज्राने आपल्या तांत्रिक कौशल्याची आणि संघभावनेची छाप पाडली.

एकूण ३० विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या या संघाचे नेतृत्व प्रसन्ना साठे यांनी केले. सुमित तंबाके आणि अनिरुद्ध कामुर्ती यांनी उपकर्णधार, यश विन्नू यांनी खजिनदार, तर ऋषिकेश देगील यांनी व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळली. ज्ञानेश्वर पुजारी यांनी चालकाची भूमिका बजावली. रोहन कोंडा यांनी ब्रेकिंग विभागाची, तर पुष्कर उदगीरी यांनी सेफ्टी अँड इकॉनॉमिक्स विभागाची जबाबदारी पार पाडली. संघातील अन्य सदस्यांचेही या यशात महत्त्वपूर्ण योगदान राहिले.

संघाला महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. आर. टी. व्यवहारे, तसेच प्रा. वाय. बी. शेटे आणि प्रा. एस. टी. जगताप यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल महाविद्यालय व्यवस्थापन, प्राचार्य, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग आणि प्राध्यापकांनी टीम वज्राचे अभिनंदन केले. अशा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळून त्यांच्यात नेतृत्वगुण, संघभावना आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावर सहावा क्रमांक आणि स्किडपॅड प्रकारात उपविजेतेपद मिळवत टीम वज्राने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



# जिजाऊ ज्ञान मंदिर संकुलाचे क्रीडा स्पर्धांत घवघवीत यश

**कोंडी (कटूसत्य वृत्त):-** क्रीडा व युवक संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच विजयसिंह मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालय, कोंडी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सॉफ्ट टेनिस, ॲथलेटिक्स आणि तलवारबाजी या क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली असून, एकूण १२ विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सोलापूर येथील हरीभाई देवकरण प्रशालेत पार पडलेल्या जिल्हास्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात समृद्धी धर्मराज नन्नवरे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात दर्शना अतुल देशमुख हिने प्रथम क्रमांक पटकावला. १९ वर्षांखालील मुलींच्या गटात श्रद्धा धर्मराज नन्नवरे हिने द्वितीय, तर अक्षरा दिनकर साठे हिने तृतीय क्रमांक मिळवला. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात आदर्श ज्योतिबा गुंड याने प्रथम, युद्धाजीत दत्तात्रय भोसले याने द्वितीय, तर अथर्व रोहित चौगुले याने चौथा क्रमांक मिळवून आपल्या कौशल्याची छाप पाडली.

पंढरपूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत अथर्व संतोष गायकवाड याने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम, तर २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. आकांक्षा अनिल शिंदे हिने गोळाफेक प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला, तर कार्तिक नागनाथ दळवे याने भालाफेक प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. या कामगिरीमुळे आकांक्षा शिंदे आणि कार्तिक दळवे यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तलवारबाजी स्पर्धेतही विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश मिळवले. १७ वर्षांखालील गटात सफा एजाज शेख हिने ईपी प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला, तर १९ वर्षांखालील गटात शगुन शिवाप्पा राठोड हिने फॉईल प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे क्रीडा शिक्षक दिलीप भोसले यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवश्री गणेश नीळ, प्राचार्य सौ. सुषमा नीळ, मुख्याध्यापिका अर्चना औरादे आणि प्रतिक्षा खुणे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून आगामी विभागीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे कोंडी परिसरातील शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.



# जागतिक पातळीवरचा अभ्यास करताना स्थानिक पातळीवरचा अभ्यास देखील महत्वाचा- जयसिंह मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज व परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी दजेर्दार सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने शंकरनगर येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च येथे 'सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील वाचनालय' सुरू करण्यात आले आहे. महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

या वाचनालयाचे उद्घाटन गुरुवारी (दि. १५ ऑक्टोबर) स.म. शंकरराव मोहिते पाटील साखर कारखान्याचे चेअरमन तथा शंकरराव मोहिते पाटील हॉस्पिटल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी ट्रस्टचे सचिव सुहास यादव, सदस्य सुभाष खटके, व्यवस्थापन समितीचे वसंत जाधव, यशवंत माने देशमुख, वसतिगृह विकास समितीच्या मंगल वाघमोडे, अर्चना गायकवाड, हसीना शेख, समन्वयक पोपटराव भोसले-पाटील, प्राचार्य डॉ. प्रवीण ढवळे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात विकास समितीच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी उपक्रमामागील भूमिका स्पष्ट करताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), स्टाफ सिलेक्शन कमिशन, प्रशासकीय सेवा, पोलीस भरती, बँकिंग, रेल्वे, सरळ सेवा भरती, शिक्षक पात्रता परीक्षा अशा विविध परीक्षांत यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य मार्गदर्शन आणि दर्जेदार संदर्भ साहित्याची गरज असते. मात्र, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शांत जागा, आवश्यक पुस्तके व इंटरनेट सुविधेअभावी अडचणींना सामोरे जावे लागते. ही गरज लक्षात घेऊन महाविद्यालयाने मासिक १५१ रुपये व वार्षिक १५०० रुपये या नाममात्र शुल्कात वाचनालयाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त स्थानिक पातळीवरच ही सुविधा मिळाल्याने अभ्यासासाठी दूरच्या शहरांत जाण्याची गरज कमी होणार आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या सामान्य कुटुंबांतील तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होईल. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, अभ्यासाची शिस्त लावणे आणि स्पर्धा परीक्षांतील यशाच्या संधी वाढविणे, या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. वाचनालयासाठी जागा मर्यादित असल्याने इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर महाविद्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन नावनोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृती प्रित्यर्थ वाचन प्रेरणादिन निमित्त खास याचे उदघाट्न केले असल्याचे सांगितले.

याप्रसंगी लातूर येथे झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयातील मुलींच्या हॉलिबॉल संघाने तृतीय क्रमांक पटकवल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते खेळाडूंचा व त्यांच्या प्रशिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे उदघाट्क जयसिंह मोहिते-पाटील यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचे कौतुक करताना याठिकाणी अनेक विभागातून वेगवेगळे अभ्यासक्रम शिकवले जात असून यामधील अनेक विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असल्याचे सांगितले. येथील ४६५ विद्यार्थी हे सध्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. महाविद्यालयाच्या वतीने खास ग्रामीण भागातील मुला मुलींना दजेर्दार शिक्षणाची व अभ्यासाची सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने वाचनालयाची सुविधा निर्माण केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केवळ बौद्धिक शिक्षण न घेता विविध इतर उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. मानसिक स्वास्थ्य मजबूत ठेवण्यासाठी मोबाईल मध्ये वेळ न घालवता कोणत्याही एका छंदाची जोपासना करावी असा मोलाचा सल्ला दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मीनाक्षी राऊत यांनी केले तर आभार सौ. मंगलताई वाघमोडे यांनी मानले.




# खुनाच्या आरोपातील ९ आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर- ॲड. जयदीप माने

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रावगाव ता. करमाळा येथील वसंत केकान खून खटल्यातील आरोपी महादेव उत्तम ढाकणे सह नऊ आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री अश्विन भोभे यांनी मंजूर केला. महादेव ढाकणे, कल्याण ढाकणे, जयदत्त ढाकणे, सुमित ढाकणे, दिनकर ढाकणे, अरुणा ढाकणे, उर्मिला ढाकणे, खुशवार्ता ढाकणे, वंदना ढाकणे अशा नऊ आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज कोल्हापूर उच्च न्यायालयाने मंजूर केला.

फियार्दी व आरोपीं मध्ये शेती वहिवाटण्याच्या कारणावरून अनेक वर्षांपासून वाद होता व याच वादातून दि. २०. ०६. २०२६ रोजी फिर्यादी शुभम केकान हे शेताची ट्रॅक्टरने मशागत करत असताना आरोपींनी हत्यारांसह हल्ला चढवून फिर्यादी शुभम केकान यांना मारहाण केली व त्यांचे वडील वसंत केकान यांचा खून केला असा आरोप फिर्यादी शुभम केकान यांनी केला होता. आरोपींविरुद्ध करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

आरोपींनी बार्शी सत्र न्यायालयात केलेला अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आला होता. त्यानंतर आरोपींनी ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता.



उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी युक्तिवाद केला की, आरोपींविरुद्ध करण्यात आलेले आरोप मोघम स्वरूपाचे आहेत, कोणत्या आरोपीने मयतास मारले हे स्पष्ट नमूद करण्यात आलेले नाही, मयताचा मृत्यू आरोपींच्या मारहाणीमुळे झालेला नाही, घटने दिवशी आरोपींनी फिर्यादी विरुद्ध दिलेल्या फिर्यादीला शह देण्यासाठी आरोपींना खोटेपणाने गुंतवण्यात आलेले आहे असा युक्तिवाद केला.

न्यायमूर्तींनी दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून आरोपी महादेव ढाकणे, कल्याण ढाकणे, जयदत्त ढाकणे, सुमित ढाकणे, दिनकर ढाकणे, अरुणा ढाकणे, उर्मिला ढाकणे, खुशवार्ता ढाकणे, वंदना ढाकणे अशा नऊ आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.

या प्रकरणी सर्व आरोपींतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. एस. एच. यादव यांनी काम पाहिले.